आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२१ सप्टेंबर २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर

- दिल्ली उच्चन्यायालयाच्या ७ नवनियुक्त न्यायाधिशांचा शपथविधी

- स्वतःच्या नावावरचं सिम कार्ड इतरांना देऊ नये तसंच बनावट कागदपत्रांच्या आधारे सिम कार्ड मिळवण्याचा प्रयत्न करू नये, असा दूरसंचार विभागाचा इशारा

आणि

- आशियाई क्रीडास्पर्धांमधे भारतीय खेळाडूंची विविध क्रीडाप्रकारांमधे यशस्वी आगेकूच

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. उद्या त्यांच्या हस्ते, केवडिया इथं एकता नगर मधे ७२वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान करण्यात येतील. त्यानंतर येत्या बुधवारी त्या महाराजा सयाजीराव बडोदा विद्यापीठाच्या ७५ व्या वार्षिक दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार आहेत.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकीर्दीला २५ वर्षं पूर्ण होत आहेत. 'जनसेवेतून देशसेवा हा मंत्र आणि सतत समर्पणभावाचा' हा प्रवास आहे. सेवा आणि सुशासन या दोन सूत्रांचा अवलंब करत २०४७पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहेत. या विशेष मालिकेत आज आपण ऐकणार आहोत मालमत्ता व्यवहारांसाठी सुरु केलेल्या रेरा कायद्याबद्दल...

**- *- होल्ड... व्हीसी- - -***

*(वाढत्या शहरीकरणाबरोबरच बांधकाम व्यवसायानंही मोठी झेप घेतली आहे. या क्षेत्रात रोजगाराचं प्रमाणही मोठं आहे. साहजिकच त्यातल्या व्यवहारांमधे ग्राहकांची फसवणूक होऊ नये यासाठी, तसंच बांधकाम उद्योगात गुंतवणुकीला चालना देण्यासाठी एक विशेष कायदा सरकारने केला.रियल एस्टेट रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट अ‍ॅक्ट २०१६ मधे संसदेत मंजूर*

*झाला. २०१७ मधे त्याची अधिसूचना जारी झाली. त्यानुसार राज्याराज्यांमधे रेरा कायदे बनवण्यात आले. महाराष्ट्रात महारेराची स्थापना ८ मार्च २०१७ रोजी झाली. नंतर दमण दीव आणि दादरा नगरहवेली या केंद्रशासित प्रदेशातही महारेराचं कार्यक्षेत्र लागू झालं. कायद्यानुसार रिअल इस्टेट नियामक प्राधिकरण आणि अपीलीय न्यायधिकरणाची देखील स्थापना झाली. रेरा आल्यानंतर विकासकांना बांधकाम प्रकल्पांची माहिती प्रसिद्ध करणं आणि रेरा मधे नोंदणी करणं बंधनकारक झालं. रिअल इस्टेट एजंटांचीही नोंदणी अनिवार्य झाली.रेरा न्यायधिकरणामधे प्रकल्पांची तपासणी , मुदतवाढ, तक्रारींचं ६० दिवसात निवारण, ही कामं होतात. त्याचं पालन न करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांवर कारवाई केली जाते. घर खरेदी करणाऱ्या खरेदीदारांमधे हक्कांबद्दल जागृती आवश्यक आहे. त्यानुसार सदनिका वाटप झाल्यानंतर ३ महिन्यात खरेदीदारांच्या संघटनेची स्थापना करणं बंधनकारक आहे.*

*रेरा न्यायधिकरण केवळ कायद्याच्या तरतुदीतली प्रकरणं हाताळत असल्यानं जलदगतीनं त्याचा निपटारा होतो. घर खरेदीसाठी ग्राहकांना प्रकल्पाची पूर्ण माहिती मिळते. प्रकल्पाला विलंब झाल्यास किंवा फसवणूक झाल्यास ग्राहकांना कायद्याचं संरक्षण मिळतं. त्यामुळे मालमत्ता विकास आणि खरेदी विक्री व्यवहार सुरळीत व्हायला मदत झाली आहे.)*

**<><><><><>**

दिल्ली उच्च न्यायालयात आज सात न्यायाधिशांचा शपथविधी झाला. यामुळे दिल्ली उच्च न्यायालयातल्या न्यायाधिशांची संख्या आता १५० झाली आहे. मुख्य न्यायाधीश डी.के. उपाध्याय यांनी न्यायमूर्ती निवेदिता शर्मा, निशा सहाय सक्सेना, संजय शर्मा, भरत पाराशर, अदिती चौधरी, दिनेश भट्ट और अरुण भारद्वाज यांना आज पदाची शपथ दिली.

**<><><><><>**

फार्मा कोविजिलन्स अर्थात औषधांच्या दुष्परिणांवर देखरेख ठेवणाऱ्या प्रणालीच्या क्षेत्रातला गेल्या काही वर्षांतला भारताचा प्रवास हा आत्मनिर्भरतेचं एक उल्लेखनीय उदाहरण ठरला आहे, असं प्रतिपादन आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी केलं. त्या आज नवी दिल्लीत नॅशनल फॉर्म्युलरी ऑफ इंडियाच्या सातव्या आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होत्या. सध्या देशात औषधांच्या दुष्परिणामांवर देखरेख ठेवणारी अकराशेपेक्षा जास्त केंद्र कार्यरत आहेत आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांइतकीच या केंद्रांची

संख्या विस्तारण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं पटेल म्हणाल्या. जागतिक आरोग्य संघटनेकडे औषधांच्या दुष्परिणामांची माहिती पुरवण्याच्या बाबतीत भारताने २०१४च्या तुलनेत १२३व्या क्रमांकावरून आठव्या क्रमांकावर झेप घेतल्याचंही पटेल यावेळी म्हणाल्या. नागरिकांनी स्वतःहून औषधं घेणं टाळावं, तज्ज्ञांनी लिहून दिलेल्या औषधाच्या सूचनांचं पालन करावं आणि कोणत्याही औषधाचा अचानक आणि अनपेक्षित दुष्परिणाम दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये, असं आवाहन पटेल यांनी केलं.

<><><><><>

देशभरात भटक्या गुरांसाठी निवारागृहं बांधण्याच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या याचिकेवरच्या सुनावणीसाठी विशेष पीठ स्थापन करायला सर्वोच्च न्यायालयानं मान्यता दिली आहे.

न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या अध्यक्षतेखालच्या विशेष पीठानं निवारागृहं बांधण्याचे निर्देश दिले असून त्यासाठी प्राधिकरणाला सुमारे ७ हजार कोटी रुपये खर्च करावे लागतील, असं प्राधिकरणाची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितलं. हे काम प्राधिकरणाचं नसून स्थानिक प्रशासनानं करण्याची गरज आहे, असं मेहता म्हणाले. विशेष पीठाची पुनर्रचना करण्याची मागणी त्यांनी केली. तसंच यात भटक्या कुत्र्यांच्या समस्येचा अंतर्भाव करावा, असंही ते म्हणाले.

<><><><><>

सायबर फसवणुकीतला दूरसंचार संसाधनांचा गैरवापर रोखण्याच्या दृष्टीनं दूरसंचार विभागानं नागरिकांना सतर्क केलं आहे. नागरिकांनी स्वतःच्या नावावरचं सिम कार्ड इतरांना देऊ नये तसंच बनावट कागदपत्रांच्या आधारे सिम कार्ड मिळवण्याचा प्रयत्न करू नये, असं आवाहन विभागानं केलं आहे. संचार साथी पोर्टल किंवा मोबाईल अँप द्वारे स्वतःचं मोबाईल कनेक्शन नियमितपणे तपासून बघण्याची सूचनाही त्यांनी केली आहे.

बोगस कागदपत्रांच्या आधारे सिम कार्ड घेणं, दूरसंचार ओळखपत्राचा गैरवापर किंवा आय एम ई आय क्रमांकात फेरफार करणं हे शिक्षापात्र गुन्हे असून त्यासाठी तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि ५० लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

<><><><><>

आशियाई क्रीडास्पर्धांमधे भारतीय खेळाडूंची विविध क्रीडाप्रकारांमधे यशस्वी वाटचाल सुरु आहे. कबड्डीमधे जपानबरोबरचा सामना ४९ विरुद्ध २४ गुणांनी जिंकून भारताच्या पुरुष संघानं आज विजयी सलामी दिली.

नेमबाजीत १० मीटर एअर रायफल गटात हिमांशु धिल्लाँने रौप्य तर रुद्रांक्ष पाटीलने कांस्यपदक पटकावलं. सांघिक प्रकारातही हिमांशु, रुद्रांक्ष आणि पार्थ मानेच्या चमूने रौप्य पदक मिळवलं.

मिश्र मार्शल आर्ट्स प्रकारात सुचिका तारियालने कांस्य पदक निश्चित केलं आहे.

क्रिकेटमधे सानो इथल्या स्टेडीयमवर उद्या भारत विरुद्ध जपान हा सामना रंगणार आहे. पुरुष हॉकीमधे भारताचा सामना श्रीलंकेबरोबर होईल. मुष्टियुद्धात भारताच्या सुमित कुंडूने ७० किलो वजनी गटात थायलंडच्या बुनजोंग सिन्सिरीला हरवून विजयी सलामी दिली.

बॅडमिंटनमधे आयुष शेट्टी आणि लक्ष्य सेनने आपापले सामने जिंकले आहेत. टेबल टेनिसच्या सांघिक स्पर्धेत भारतीय महिलांनी पाकिस्तानचा पराभव करुन उपान्त्य फेरीत प्रवेश केला.

**<><><><><>**

इराणविरुद्ध सुरू असलेल्या संघर्षाबाबत आपण ठोस निर्णय घेण्याच्या विचारात असून, लवकरच काहीतरी मोठी घटना घडणार असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. युद्ध संपवण्याच्या उद्देशाने वाटाघाटी पुन्हा सुरू करण्यासाठी इराणने कतारमार्फत अमेरिकेला सात अटी कळवल्या आहेत, ज्यात होर्मुझची सामुद्रधुनी' पुन्हा खुली करण्याबाबतच्या शर्तींचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेला उपस्थित राहण्यासाठी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान न्यूयॉर्कला जाणार आहेत, त्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांच्या या विधानांना विशेष महत्व दिलं जात आहे.

दरम्यान, आपल्या अटी अमेरिका मान्य करेपर्यंत ही सामुद्रधुनी खुली करण्यात येणार नाही असं इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बघेर घालिबाफ यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

रशिया आणि यूक्रेन यांच्यातला तणाव कमी करण्याच्या प्रयत्नांना गती देण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उद्या न्यूयॉर्कमध्ये यूक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांची भेट घेणार आहेत.

**<><><><><>**

गणेशोत्सवाच्या सातव्या दिवशी काल मुंबईत ६ हजार ४३६ गणेशमूर्तींचं विसर्जन झालं. यात ९९ सार्वजनिक मंडळांच्या, ६ हजार १२७ घरगुती गणेशमूर्तींचा आणि २१० ज्येष्ठागौरींचा समावेश होता, अशी माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेनं दिली आहे.

**<><><><><>**

हवामान विभागाने येत्या दोन ते तीन दिवसांत ओडिशा, आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीचे क्षेत्र, तेलंगणामध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसंच कोकण, मध्य महाराष्ट्र, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, कर्नाटक, गोवा आणि ईशान्येकडील राज्यांच्या काही तुरळक भागात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**